| MHNG180000652019 | **– : कि.फौ.अ.क्र. ११/२०१९ मधील कलम २३ खालील अर्जावरील आदेश : (सुषमा वि रविंद्र व इतर )** |
|---|---|

१. सदरचा अर्ज अर्जदार सुषमा रविंद्र गवळी यांनी गैरअर्जदारां विरुध्द कौटुबिक हिंसाचारापासुन महिलांचे संरक्षण कायदा २००५ (सदर कायदा) चे कलम २३ अन्वये तात्पुरते/ अंतरिम पोटगी व इतर आदेश मिळविण्यासाठी दाखल केलेला आहे.

२. अर्जदाराचे थोडक्यात म्हणणे असे आहे की, तिचा व गैरअर्जदार क्र.१ चा विवाह हिंदु जाती रितीरिवाजाप्रमाणे दिनांक २७.०३.२०१६ रोजी मौजे कळमेश्वर येथे पार पडला होता. लग्नानंतर अर्जदार ही गैरअर्जदारांकडे नांदायला गेली. तेथे सर्व गैरअर्जदार एकत्रित कुटुंबात राहत होते. तेथे गैरअर्जदार क्र. १ ने तिला तीन महिन्यापर्यंत चांगली वागणुक दिली. त्यानंतर अर्जदार गरोदर राहिली परंतु, गैरअर्जदाराने तिची काळजी घेतली नाही त्यामुळे दिनांक १८.०८.२०१६ रोजी तिचा गर्भपात झाला. त्यानंतर गैरअर्जदाराने तिला शिवीगाळ व मारहाण करण्यास सुरवात केली. इतर गैरअर्जदार सुध्दा अर्जदारास त्रास देण्यासाठी गैरअर्जदार क्र. ०१ वर दबाव टाकत असे. गैरअर्जदार क्र. १ ला दारु पिण्याचे व्यसन आहे. दारु पिवून बरेचदा त्याने अर्जदार क्र. १ ला मारहाण केली आहे.

३. अर्जदार दिनांक २९.०९.२०१८ ला तिच्या मावशीसोबत भावाच्या मुलाला बघण्यासाठी लता मंगेशकर हॉस्पिटल हिंगणा येथे गेली होती. तेथून परत

आल्यावर गैरअर्जदाराने तिला परत घेतले नाही. त्यानंतर सदर घटनेच्या आठ ते दहा दिवसानंतर अर्जदाराच्या आईवडिलांनी तिला सासरी पोहचवून दिले. परंतु, गैरअर्जदाराने तिला घरात घेतले नाही. त्यामुळे तिने पो.स्टे. बुटीबोरी येथे दिनांक २६.०६.२०१८ ला तक्रार दिली. तेव्हापासून अर्जदार तिच्या माहेरी राहत आहे. दरम्यानच्या काळामध्ये गैरअर्जदाराने तिला फोन करुन विचारपूस करण्याचा व मदत करण्याचा कोणताही प्रयत्न केलेला नाही. एकंदरित, गैरअर्जदारांनी अर्जदाराचा कौटुंबिक छळ केलेला आहे.

४. अर्जदाराचे पुढे असे म्हणणे आहे की, गैरअर्जदार क्र. १ हा लोकमत प्रेस कंपनी बुटीबोरी येथे काम करत असून त्याला महिन्याला हजार रुपये एवढा पगार मिळतो. या उलट, अर्जदाराकडे उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही. त्यामुळे, दरमहा रुपये ८,०००/- म्हणुन अंतरिम पोटगी, संरक्षण आदेश व नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी केली.

५. प्रकरणात गैरअर्जदार हजर झाले. त्यांनी त्यांचा लेखी जबाब निशाणी क्र. ०८ वर दाखल केला. त्यात गैरअर्जदारांनी अर्जदार क्र. ०१ सोबत असलेले नातेसंबंध मान्य केले. परंतु, गैरअर्जदारांनी अर्जदाराला मारहाण केली, तिला दारुच्या नशेत वारंवार शिवीगाळ केली, या सर्व बाबी नाकारल्या आहेत. गैरअर्जदारांनी असे म्हणणे मांडले की, अर्जदार ही सासरी राहत असताना घरातील कुठलेही काम व्यवस्थित करत नव्हती. ती नेहमी तब्येतीचा बहाना सांगून काम करण्यास टाळाटाळ करत होती. गैरअर्जदार क्र. १ ने अर्जदाराच्या तब्येतीवर आजपर्यंत तीन ते चार लाख रुपये खर्च केलेले आहे. त्याने तिच्यावर कोणताही कौटुंबिक हिंसाचार केलेला नाही. गैरअर्जदार क्र. १ हा खाजगी ठेकेदाराकडे काम करत असून त्याला मासिक पाच हजार रुपये मिळतात तसेच, त्याच्यावर त्याच्या आईची सुध्दा जबाबदारी आहे. अर्जदार ही तिच्या मर्जीने तिच्या

माहेरी गेली आहे. त्यामुळे, ती कोणतीही पोटगी मिळविण्यासाठी पात्र नाही.

६. अर्जदाराच्या वतीने त्यांचे वकिल सौ. डी.डी. बुरबुरे यांचा युक्तिवाद ऐकला. गैरअर्जदार व त्यांच्या विद्वान वकिलांचा पुकारा केला असता ते हजर झाले नाहीत. करिता त्यांच्या तोंडी युक्तिवादाविना प्रकरण पुढे चालविण्यात आले. प्रस्तुत प्रकरणात हे निर्विवाद तथ्ये आहे की, अर्जदार क्र. १ व गैरअर्जदार क्र. ०१ यांचे लग्न झाले असुन ते सोबत नांदलेले सुध्दा आहेत त्यामुळे, प्रथमदर्शनी असे निदर्शनास येते की, अर्जदार क्र. १ व गैरअर्जदार क्र. ०१ यांच्या मध्ये कौटुंबिक नातेसंबंध होते.

७. प्रकरणातील प्रथमदर्शनी पुराव्याचे अवलोकन करण्याआधी सदर कायद्याच्या कलम २३ मधील कायदीय बाबींचे अवलोकन करणे आवश्यक आहे. सदर कायद्याच्या कलम २३ मध्ये असे नमुद करण्यात आले आहे की, न्यायालयास न्याय व योग्य वाटत असेल व सकृतदर्शनी कौटुंबिक हिंसाचार झाला आहे अथवा नाही किंवा तशी होण्याची शक्यता असेल तर न्यायालय अंतरिम आदेश पारित करु शकतात. या ठिकाणी हे सुध्दा नमुद करणे आवश्यक आहे की, कोणत्याही अंतरिम मागणीचा विचार करताना संपरिक्षेमध्ये अपेक्षित असणा-या भक्कम पुराव्याची आवश्यकता नाही. अंतरिम मागणीचा अर्ज निकाली काढताना सकृतदर्शनी पुरावा बघणे आवश्यक आहे. या व्यतिरिक्त अर्ज निकाली काढताना सदर कायद्याच्या हेतु व उद्देशांकडे सुध्दा डोळस दृष्टीने बघणे आवश्यक आहे. सदर कायदा हा महिलां विरुध्द होणा-या हिंसाचारास प्रतिबंध करण्याकरिता तसेच महिलांचे सक्षमीकरण करण्या करिता पारित करण्यात आला आहे. सदर कायद्यामध्ये पुरुषांच्या नैसर्गिक तसेच मुलभुत कर्तव्यांची जाणीव करुन देण्यात आली आहे. प्रत्येक पुरुषाचे हे कर्तव्य आहे की त्याने त्याच्या पत्नीचा व मुलांचा सांभाळ करावा. प्रस्तुतचे कलम २३ अन्वये न्यायालयास अंतरिम पोटगी देण्यासंबधी

स्वेछाधिकार प्राप्त आहे. सदर स्वेच्छाधिकार हा निपक्षपातीपणे तसेच वैवाहिक कायद्याच्या तत्वाचे मार्गदर्शन करणारा आणि कायद्याच्या चौकटीमध्ये व कायद्याच्या उद्दिष्टांना अनुसरुन करण्यात यावा हे सर्वश्रुत आहे.

८. प्रस्तुत प्रकरणात अर्जदार क्र. १ व गैरअर्जदार क्र. ०१ यांच्या मधील नातेसंबंधाबाबत कोणताही आक्षेप नाही. त्यामुळे, सदर कायद्यामध्ये नमुद असलेली कौटुंबिक संबंध ही बाब उभयपक्षांमध्ये असल्याचे दिसुन येते. यानंतर, सकृतदर्शनी कौटुंबिक हिंसाचार झाला किंवा नाही ही बाब पडताळुन पाहणे आवश्यक ठरते. अंतरिम पोटगीसाठी सकृतदर्शनी पुराव्याची आवश्यकता आहे. सकृतदर्शनी पुरावा व सबळ पुरावा हे दोन्हीही पुराव्याचे प्रकार एकमेकांपासुन वेगळे आहे. सबळ पुरावा हा उभयपक्षांनी दिलेल्या मैाखिक व कागदोपत्री पुरावा व त्यावर घेण्यात आलेला उलट तपास यावरुन ठरविण्यात येतो. या उलट, सकृतदर्शनी पुराव्याचे स्वरुप हे संक्षिप्त आहे. अंतरिम पोटगीच्या अर्जावर निर्णय देतेवेळी उभयपक्षांमार्फत अर्जात नमुद करण्यात आलेली तथ्ये, लेखी जबाबातील तथ्ये आणि पटलावर दाखल केलेले दस्त याचाच विचार करावा लागतो. तसेच, सदर कायद्याच्या कोणत्याही कलमाखाली आदेश करित असताना सदर कायद्याचा हेतु व उद्दिष्टांकडे सुध्दा लक्ष द्यावे लागते. सदर कायद्याचा उद्देश हा पिडीत व्यक्तिच्या पतीला अथवा त्यांचे नातेवाईकांना शिक्षा देणे हा नक्कीच नाही. या व्यतिरिक्त अंतरिम पोटगी किंवा अर्जावर पिडितेच्या बाजुने आदेश झाला म्हणजे गैरअर्जदारांना प्रकरणात त्यांची बाजु मांडण्याचा अधिकार नाही असाही कायद्याचा स्थापित नियम नाही. अंतरिम आदेशाची तरतुद केवळ काही काळासाठी अर्जदारास चरितार्थ चालविण्यासाठी पैशाच्या स्वरुपातील मदत जलद रितीने व्हावी यासाठी करण्यात आलेली आहे.

९. सदर प्रकरणामध्ये अर्जदाराने असे म्हणणे मांडले आहे की, ती सन

२६.१०.२०१८ पासून तिच्या माहेरी राहते. गैरअर्जदाराने सुध्दा या गोष्टीला नकार दिलेला नाही. या ठिकाणी हे नमूद करणे आवश्यक आहे की, अंतरिम मागणीचा विचार करत असताना सदर अधिनियमाच्या कलम ३ मध्ये नमूद केलेल्या कोणताही हिंसाचार विचारात घेता येतो. गैरअर्जदार क्र. १ हे पती या नात्याने अर्जदारास सांभाळण्याची नैतिक जबाबदारी आहे परंतु, त्याने दिलेल्या जबाबामध्ये अर्जदारांना आर्थिक स्वरुपाची मदत केली हे दिसून येत नाही त्यामुळे सदर बाब आर्थिक छळाच्या व्याख्येमध्ये मोडणारी आहे. गैरअर्जदाराने अर्जदाराच्या विरुध्द केलेल्या आरोप प्रत्यारोपाच्या अनुषंगाने पुरावा देण्याची संधी संपरिक्षेदरम्यान आहे. वरील सर्व विवेचनावरुन मी या निर्णयास येतो की, अर्जदार ही अंतरिम पोटगी मिळविण्यास पात्र आहे.

**१०.** अंतरिम पोटगी निश्चित करताना गैरअर्जदाराचे उत्पन्न, अर्जदाराच्या जगण्याचे राहनीमान व कौटुंबिक दर्जाही लक्षात घेणे गरजेचे आहे. अर्जदाराने असे म्हणणे मांडले आहे की, गैरअर्जदार क्र. १ ला महिन्याला रुपये. १०,०००/– एवढा पगार मिळतो. या उलट, गैरअर्जदार क्र. १ याला रुपये ५,०००/– महिना मिळतो ही बाब त्याने लेखी जबाबात मान्य केलेली आहे. त्यामुळे सदर बाब नक्कीच लक्षात घेता येईल. ह्या उलट, उबगी सारख्या ठिकाणचे जीवनमान बघता अर्जदारास दरमहा रुपये २०००/– (रुपये दोन हजार ) पुरेसे वाटतात. वरील चर्चेच्या अनुषंगाने खालील आदेश पारित करण्यात येतो.

## आदेश

| | |
|---|---|
| **१.** | अर्ज अंशतः मंजुर करण्यात येतो. |
| **२.** | अर्जदाराची अंतरिम पोटगीची मागणी अंशतः मंजुर करण्यात येत आहे. |
| **३.** | गैरअर्जदार क्र. ०१ रविंद्र तुळशीरामजी गवळी यांना असे निर्देशित करण्यात येते |

| | |
|---|---|
| | की, त्यांनी अर्जदार सुषमा गवळी हिला अंतरिम पोटगी रक्कम रुपये २०००/- (रुपये दोन हजार ) प्रतिमहा ही प्रस्तुत अर्जात दाखल दिनांक ११.०१.२०१९ पासुन मुळ अर्जाचा निकाल लागेपर्यंत द्यावी. |
| ४. | अर्जदार व गैरअर्जदारांना असे निर्देशित करण्यात येते की, त्यांनी हेतुपुरस्सर प्रकरणात विलंब न करता प्रकरण पुढे चालवावे. |
| ५. | सदर आदेशाची प्रत दोन्ही पक्षास विनाशुल्क देण्यात यावी. |

कळमेश्वर
दिनांक १०.०२.२०२१

(हर्षल ना. पोले)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
कळमेश्वर, जि. नागपुर

**ENDORSEMENT**

| | | |
|---|---|---|
| Case Argued on | : | 10.02.2021 |
| Judgment dictated on | : | 10.02.2021 |
| Transcription Ready on | : | 10.02.2021 |
| Judgment checked and signed off | : | 10.02.2021 |

**प्रमाणपत्र**

मी खात्रीपूर्वक असे कथीत करतो की, पी.डी.एफ. फाईल मधील न्यायनिर्णय हे मुळ न्यायनिर्णय प्रतीप्रमाणे तंतोतंत शब्दशः बरोबर आहे

लघुलेखकाचे नाव – आर.एम. परमाल (नि.श्रे.)